# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## - परिपत्रक -

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक व प्रशासकीय विभागांमध्ये तसेच अहमदनगर आणि नाशिक उपकेंद्राकरिता आवश्यकतेनुसार **रोजगार प्रोत्साहन कार्यक्रमातंर्गत (EMPLOYMENT PROMOTION PROGRAMME)** सहायक (प्रशिक्षणार्थी) व शिपाई (प्रशिक्षणार्थी) सहा महिन्यांच्या कालावधीकरिता एकत्रित विद्यावेतनावर मुलाखतीद्वारे घेण्यात येतात.

या परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात येते की, विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक व प्रशासकीय विभागांकरिता व अहमदनगर उपकेंद्राकरिता सहायक (प्रशिक्षणार्थी) रोजगार प्रोत्साहन कार्यक्रमातंर्गत EPP अन्वये प्रतिमाह रु.१२०००/- (अक्षरी रुपये बारा हजार फक्त) या एकत्रित विद्यावेतनावर सहा महिन्यांच्या कालावधीकरिता घेण्याकरिता शासनाच्या कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालयाच्या www.rojgar.mahaswayam.in या संकेतस्थळावर Vacancy Order नोंदविण्यात आलेली आहे. सहायक (प्रशिक्षणार्थी) या पदाकरिता शैक्षणिक अर्हता खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| १. | एच.एस.सी.उत्तीर्ण किंवा कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी परीक्षा उत्तीर्ण. |
| २. | मराठी ३० शप्रमि किंवा इंग्रजी ४० शप्रमि टंकलेखन शासकीय प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक. |
| ३. | संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र. |

सदर पदाकरिता वय, आरक्षण, एकूण पदसंख्या इत्यादीबाबतची माहिती सदर संकेतस्थळावर देण्यात आलेली आहे. सहायक (प्रशिक्षणार्थी) या पदाकरिता ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याकरिता जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राकडे नांवनोंदणी केलेली असणे आवश्यक आहे. ज्या उमेदवारांनी जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राकडे नांवनोंदणी केलेली नाही अशा उमेदवारांनी www.rojgar.mahaswayam.in या संकेतस्थळावर जाऊन Jobseekar द्वारे Registration करावे. तद्नंतर सदर संकेतस्थळावर सहायक (प्रशिक्षणार्थी) या पदाकरिता ऑनलाईन पध्दतीने अर्ज करणे आवश्यक राहील. उमेदवारांकरिता ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याकरिता अंतिम दिनांक २१.०९.२०१७ असा आहे.

AS
6/9/17

(डॉ.अरविंद द.शाळीग्राम)
**प्रभारी कुलसचिव**

गणेशखिंड, पुणे ४११ ००७
जा.क्र. : एएन/ 3317
दिनांक : 06.०९.२०१७

D:\Advertiesment\EPP Part - 10\Paripatrak.docx